

# ओपनिंग्ज...

## भिती आणि निर्मिती

• केतन गाडगीळ



एका अंध शाळेच्या प्रोजेक्टवर काम करत असताना काही अंध विद्यार्थ्यांशी गप्पा मारायची संधी मिळाली. कुतुहलानं मी त्यांना विचारलं की तुमच्या शाळेच्या, वसतिगृहाच्या खिडक्या, दरवाजे नेमके कुठे आहेत हे तुम्हाला कसं कळतं?

त्यावर शाळेतली एक चिमुरडी पटकन उत्तरली, 'अहो चालताना खिडकी, दरवाज्याच्या जवळ आल्यावर जर माझ्या पायापर्यंत वारं लागलं तर तो दरवाजा आहे आणि कंबरेपर्यंत वारं लागलं तर ती खिडकी आहे हे आपोआपच लक्षात येतं आणि रोजचं झालं की सरावाचंही होतं.'

ही गोष्ट सांगायचं कारण असं की, एखाद्या घराच्या अथवा कोणत्याही वास्तूच्या रचनेत आणि अंतररचनेत त्या वास्तूत असणाऱ्या खिडक्या, दरवाजे, झरोके यांसारख्या 'ओपनिंग्ज'चं महत्त्व खूप आहे. वास्तूत आवश्यक असणारा भरपूर उजेड आणि खेळती हवा राहण्याच्या दृष्टीने दरवाजा-खिडक्यांची लोकेशन्स योग्य ठिकाणी तर हवीतच; पण त्यांचे आकारही तितकेच महत्त्वाचे.

वास्तूची अंतररचना करत असताना ओपनिंगच्या गोलाकार, चौकोनी, त्रिकोणी अशा विविध आकारांचा, ओपनिंगला विशिष्ट पद्धतीने दिलेल्या उठावांचा (प्रोजेक्शन्स) वापर त्या वास्तूच्या इंटेरियरचा फोकल पॉइंट म्हणूनही करता येतो.

पूर्वीच्या कौलारू घरांच्या उभट आकाराच्या अनेक खिडक्या, माजघरात असलेला एक छोटा झरोका, पुढे ब्रिटिश काळातील इमारतींच्या आर्क टाइप खिडक्यांपासून ते आत्ताच्या ट्रेंडनुसार असणारी मोठमोठी ग्लास फॅकेड्स... ओपनिंग्ज अशी काळानुसार बदलत गेली आहेत.

आजकाल मोठ्या शहरांमध्ये जवळजवळ असणाऱ्या उंच इमारतींमध्ये फक्त एकाच बाजूची भिंत ओपनिंगसाठी राखून ठेवलेली दिसते. इमारतीच्या एलिव्हेशनच्या दृष्टीने केलेल्या खिडक्यांच्या रिपिटेटिव्ह वापरातून दिसणारा ऱ्हिदम एसीच्या युनिटमुळे ब्रेक होतानाही आढळतो.

महानगरांमध्ये बंगले, चाळींची जागा इमारतींनी घेतली. त्यामुळे अर्थातच मोठ्या गच्चीत उघडणाऱ्या खिडक्या चाळीच्या व्हरांड्यात उघडणारे दरवाजे, खिडक्यांची



जागा इमारतीत लिव्हिंग रूमला जोडून असणाऱ्या टेरेसच्या फ्रेंच डोअरने घेतली. टेरेसला असलेल्या या मोठ्या ओपनिंगमुळे दरवाजे उघडल्यावर एक्स्टेंडेड लिव्हिंग एरिया मिळू लागला. या जागेच्या फायद्याबरोबरच मोठ्या ओपनिंगमुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने सेफ्टी डोअर आणि लोखंडी ग्रिल मात्र सर्वत्र दिसू लागली.

प्रमाणबद्ध आकारातील आणि योग्य ठिकाणी असलेल्या ओपनिंगमधून देवळाच्या आतील गाभाऱ्यात देवीच्या चेहऱ्यावर पोहचणारा सूर्यकिरण. या सूर्यभ्रमणाचा विचार करून ठेवलेल्या ओपनिंगचं वास्तुशास्त्रातील महत्त्वाचं उदाहरण म्हणजे कोल्हापूरचं महालक्ष्मी मंदिर.

ओपनिंग म्हणजे फक्त दरवाजे, खिडक्या, झरोके एवढंच नव्हे तर छतातून उजेड आत येण्यासाठी ठेवलेले स्कायलाइटचं ओपनिंग, दरवाज्याच्या चौकटीत न अडकता दोन स्पेसना जोडणाऱ्या कमानी, एखाद्या खोलीतून दुसऱ्या खोलीत अंतररचनेच्या दृष्टीने व्हिज्युअल कनेक्शनसाठी भिंतीत ठेवलेल्या स्लिटसुद्धा ओपनिंगचं एक अंग आहे.

काहीवेळा गरजेपेक्षा लहान ओपनिंग वापरण्याच्या दृष्टिकोनातून अनुपयोगी ठरतात, तर मोठी, लो लेव्हल खिडक्यांची ओपनिंग घरात खिडकीतल्या बैठकीची जागाही तयार करतात. विशिष्ट खोलीच्या फर्निचरची मांडणी करताना ओपनिंग नसलेलीही भिंत चांगल्याप्रकारे वापरता येते. 'हवा, उजेडासाठी ओपनिंग' या फंक्शनल आस्पेक्टबरोबर सौंदर्यशास्त्रानुसार एखाद्या सलग भिंतीवर असलेले प्रमाणबद्ध ओपनिंग, वास्तूच्या डेड मासची मोनोटोनी तोडून वास्तूला उठाव आणते.

जपानीज वास्तुरचनाकार ताडाओ आन्दो याने केलेल्या 'चर्च ऑफ लाइट'च्या वास्तूत, चर्चच्या पूर्वेकडील भिंतीवर कोणतंही ओपनिंग न घेता ठेवलेली क्रॉसच्या आकारातील स्लिट ही प्रार्थनागृहात कुठल्याही प्रतिमेचा वापर न करता अनादि अनंत अशा ऊर्जा स्रोतालाच आद्य मानत वास्तूला एक वेगळंच परिमाण प्राप्त करून देते.

◆◆◆

महानगरांमध्ये बंगले, चाळींची जागा इमारतींनी घेतली. त्यामुळे अर्थातच मोठ्या गच्चीत उघडणाऱ्या खिडक्या चाळीच्या व्हरांड्यात उघडणारे दरवाजे, खिडक्यांची जागा इमारतीत लिव्हिंग रूमला जोडून असणाऱ्या टेरेसच्या फ्रेंच डोअरने घेतली. टेरेसला असलेल्या या मोठ्या ओपनिंगमुळे दरवाजे उघडल्यावर एक्स्टेंडेड लिव्हिंग एरिया मिळू लागला. या जागेच्या फायद्याबरोबरच मोठ्या ओपनिंगमुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने सेफ्टी डोअर आणि लोखंडी ग्रिल मात्र सर्वत्र दिसू लागली.